नेहमी सत्याच्या मार्गावर चालत रहा,कारण वेळ आपल्या पाठीशी उभी राहील.

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार १० एप्रिल २०२५ | अंक ११९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






# नरेंद्र मोदी विष्णूचा अवतार, मग ट्रम्पवर आत सुदर्शन चक्र सोडलं पाहिजे - संजय राऊत

**नरेंद्र मोदी हे विषणूचे आवतार.**

**.. आहेत का? तिकडे ट्रम्प भारताला धु-धु धुतोय आणि विष्णूचे अवतार गप्प आहेत. अख्ख जग ट्रम्प यांच्या टॅरिफ विरोधात उठले आहे आणि केवळ एकच देश भारत देश तोंडात गोळ्या घालून बसलाय. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विष्णूचा अवतार आहेत ना, मग या देवाने ट्रम्प यांच्यावर सुदर्शन चक्र सोडायला हवे. काही बोलतात हे लोक, चंद्रशेखर बावनकुळे आणि रत्नागिरीचे उदय सामंत. सत्तेवर बसले आहेत. भोंगे सुटले आहेत, या शब्दांत संजय राऊतांनी निशाणा साधला.**

गुढीपाडवा मेळाव्यात मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील उत्तर भारतीयांविरोधात प्रक्षोभक वक्तव्य केले. त्यामुळे त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्यांच्या पक्षाची मान्यता रद्द करावी, अशी मागणी करणारी याचिका उत्तर भारतीय विकास सेनेचे अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. तर, हे भाजपचे षड्यंत्र असल्याचा आरोप मनसे नेते संदीप देशपांडे यांनी केला आहे. यावरून मनसे आक्रमक झाली असून, राजकीय वर्तुळातील काही पक्षांकडून मनसेवर टीका केली जात आहे. उत्तर भारतीयांविरोधातील हिंसेला राज ठाकरे पाठिंबा देत आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने ठाकरे आणि त्यांच्या पक्षावरील कारवाईसंदर्भात निवडणूक आयोगाला आणि राज्य सरकारला आदेश द्यावेत अशी मागणी केली आहे, असे शुक्ला यांनी म्हटले आहे. तर, मनसेची मान्यता रद्द करावी, यासाठी कुणीतरी उत्तर भारतीय म्हणे न्यायालयात गेला आहे. मराठी प्रादेशिक पक्षांना संपवण्याच्या षड्यंत्रामागे भाजप आहे, असे मनसे संदीप देशपांडे म्हणाले. यावरून आता ठाकरे गटाचे खासदार यांनी भाजपावर टीका केली आहे.

## सर्वात आधी भाजपाची मान्यता रद्द करा,

.तर सर्वांत आधी भाजपाची मान्यता रद्द करा, मनसे वगैरे नंतर धार्मिक द्वेष हा विषय असेल तर सर्वांत आधी भारतीय जनता पार्टीची मान्यता रद्द करायला हवी. धार्मिक द्वेष, धर्मांधता पसरवण्याचे काम या देशात कोणी करत असेल तर ते काम भाजपा करत आहे. भाजपाचे प्रचारक, कोणीतरी धीरेंद्र शास्त्री असे म्हणतात की, कोणत्याही गावात मुसलमानाने राहता कामा नये. गावांमध्ये केवळ हिंदूंनी राहावे. अशा प्रकारची भाषा करणारे लोकही या देशात आहेत. ते बुवा देखील असेच म्हणतात आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्या बुवाच्या दर्शनाला जातात. मोदी त्या बुवाचे दर्शन घेतात, त्याच्या कार्यक्रमांना हजेरी लावतात याचाच अर्थ मोदींची त्या शास्त्रीबुवांच्या म्हणण्याला मान्यता आहे. त्यामुळे हा धार्मिक द्वेषाचा मुद्दा असेल तर धार्मिक द्वेष पसरवला म्हणून सर्वांत आधी भारतीय जनता पार्टीची मान्यता रद्द करायला हवी. पक्षाची मान्यता रद्द करण्यास भाजपापासूनच सुरुवात करायला हवी. मनसे वगैरे नंतरचे पक्ष आहेत, अशी टीका संजय राऊतांनी केली.

# भाजपा गेवराई तालुकाध्यक्ष पदासाठी इच्छुकांची गर्दी

गेवराई : प्रतिनिधी

भाजपा तालुका कार्यालय, गेवराई (जुन्या बसस्टँड च्या बाजूला) येथे भाजपा गेवराई तालुका अध्यक्ष पदाची निवड प्रक्रिया पार पडली. यासाठी तालुका निरीक्षक म्हणून सौ. उषाताई मुंडे, व आदित्यजी सारडा यांची पक्षाकडून नियुक्ती करण्यात आली होती. कार्यालयात त्यांचे गेवराई तालुका भाजपच्या वतीने गेवराई विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप, गेवराई तालुकाध्यक्ष प्रकाश काका सुरवसे व सुरेशजी हात्ते यांनी स्वागत केले. लोकशाही व पारदर्शक पद्धतीने, भाजपा गेवराई तालुक्यातील एकूण 23 इच्छुक उमेदवारांनी नाव नोंदवून स्वतःचे मत मांडून व आपल्या मुलाखती मा.तालुका निवडणूक निरीक्षक यांच्या समोर दिल्या आहेत. सर्व माहिती, अहवाल मा.तालुका निरीक्षक यांच्याद्वारे पक्षाकडे पाठवला जाईल. तसेच तालुक्यातील सर्व इच्छुक उमेदवार व प्रमुख कार्यकर्त्यांच्या सर्वानुमते गेवराई तालुका अध्यक्ष पद निवडीसाठीचे सर्वस्वी अधिकार भाजपा नेत्या, राज्याच्या मंत्री नामदार पंकजा मुंडे यांच्यावर सोपवले आहेत.

तालुका अध्यक्ष पदाच्या इच्छुक उमेदवारांमध्ये उद्धव रासकर, राहुल राका, राजेश पवार, ईश्वर पवार, श्यामसुंदर कुंड, महादेव



धोंडरे, ईब्राहीम शेख, अशोक शिंदे, विलास शिंदे, दीपक सुरवसे, विकास पवार, सचिन दाभाडे, बळीराम कऱ्हे, कृष्णा ढाकणे, सुरेश हात्ते, बाळू उबाळे, सत्यम पवार, सुघोष मुंडे, प्रकाश सुरवसे, प्रशांत राख, श्रीकांत सानप, गणेश सातपुते, पी.टी.चव्हाण उपस्थित होते व त्यांनी मुलाखती दिल्या. दरम्यान सर्व प्रक्रियेचा भाग आहे, तालुका अध्यक्षपदी जरी एकच व्यक्ती निवडला जाणार असला तरी, पक्षाचे कार्य सर्वांना एकत्र येऊनच करायचे आहे. व गेवराई तालुक्यात भाजप आणखी बळकट करायचा आहे. तालुका अध्यक्ष निवडीनंतर लवकरच तालुका पदाधिकारी नियुक्त्या होणार आहेत. असे भाजपाचे विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप यांनी सांगितले. तसेच त्यांनी तालुका अध्यक्ष पदाचे उमेदवार व तालुका पदाधिकारी साठी असणाऱ्या सर्व इच्छुकांना शुभेच्छा दिल्या.




नवोपक्रम स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातून प्रथम येण्याचा बहुमान शिक्षक सेनेचे तालुकाध्यक्ष उद्धवजी घोडके सरांना मिळाला, तसेच सम्यक वाघमारे या विध्यार्थ्यांने नवोदय परीक्षेत घवघवीत यश मिळवून गडी येथील नवोदय विद्यालयात प्रवेश मिळवला. त्याबद्दल त्यांचा सत्कार करताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, जिल्हा समन्वयक संजयजी महाद्वार, जिल्हा प्रवक्ता गणेशजी जाधव , विधानसभा प्रमुख सुशीलजी पिंगळे, शिक्षकसेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ, सरचिटणीस नरेश गंधगे, प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण वाघमारे, घाडगे सर , महादेवजी चव्हाण, सुग्रीवजी तांदळे , प्रमोद कुलकर्णी सह आदी.

# वाळू घाटांवर अवैध तस्करी! मुख्यमंत्र्यांचे कठोर कारवाईचे आदेश

भंडारा भंडार ाजिल्ह्यात मोहाडी तालुक्यातील काही गावांमधील नदीच्या काठावर असलेल्या अनेक वाळू घाटांवर होत असलेल्या तस्करी प्रकरणी दोषी कार्यकर्ते आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसयांनी महसूल मंत्र्यांना दिले आहेत. याबाबतीत आमदार डॉ. परिणय फुके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटीत पत्र देऊन या रेती तस्करीत गुंतलेले दलाल, कार्यकर्ते व अधिकारी- कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली होती. भंडारा जिल्ह्यात मोहाडी तालुक्यातील काही गावांममधील नदीच्या काठावर असलेल्या अनेक रेती घाटांवर तस्करी होत असून या तस्करीत काही राजकीय कार्यकर्ते आणि शासकीय अधिकारी कर्मचारी गुंतले असल्याकडे तुमसर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादीकाँग्रेस(अजित पवार गट) पक्षाचे आमदार राजू कारेमोरे यांनी काही दिवसांपूर्वी एका पत्राद्वारे भंडारा जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या पत्राच्या आधारे आमदार डॉ. परिणय फुके यांनी मुख्यमंत्र्यांकडे कारवाईची मागणी केली होती. एका जबाबदार लोकप्रतिनिधीने अशी तक्रार केल्यानंतर त्या तक्रारीची शासनाद्वारे त्वरित आणि गंभीर दखल घेण्याची गरज व्यक्त करीत आमदार डॉ. फुके यांनी या संपूर्ण भ्रष्टाचारात आणि अवैध रेती तस्करीमध्ये जे कार्यकर्ते, कर्मचारी-अधिकारी गुंतलेले आहेत, त्या सर्वांवर आपण कडक कारवाई करावी अशी विनंती मुख्यामंत्र्यांकडे केली होती

# प्रशांत कोरटकरला अखेर जामीन मंजूर, कोल्हापूर सत्र न्यायालयाचा निकाल

कोल्हापूर। प्रतिनिधी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा अपमान करणाऱ्या तसेच इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी देणाऱ्या प्रशांत कोरटकरला जामीन मंजूर करण्यात आला आहे. प्रशांत कोरटकर पाच दिवस पोलिस कोठडीत आणि १० दिवस न्यायालयीन कोठडीत होता. ३० मार्च रोजी कोल्हापूर कनिष्ट न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयानं त्याचा जामीन मंजूर



केला. नागपूरच्या प्रशांत कोरटकरने इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना कॉल करुन धमकी दिली होती. तसेच त्याने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अपशब्द वापरले होते. त्यानंतर इंद्रजीत सावंत यांनी कोल्हापूरमध्ये कोरटकर विरोधात तक्रार नोंद केली होती. या प्रकरणी प्रतिक्रिया देताना इंद्रजित सावंत यांचे वकील असिम सरोदे म्हणाले की, ज्या कलमांच्या आधारे प्रशांत कोरटकरवर गुन्हे दाखल करण्यात आले होते त्यामध्ये तीन वर्षांपेक्षा जास्त शिक्षा नव्हती. त्यामुळे तांत्रिक गोष्टींचा आधार घेत त्याला जामीन मंजूर होणं हे सहाजिकच आहे. प्रशांत कोरटकरने जे वक्तव्य केलं त्याची व्याप्ती न्यायाधीशांनी लक्षात घ्यायला हवी होती आणि त्याला जामीन द्यायला नको होता. या प्रकरणी पोलिसांनी तपास पूर्ण झालं नाही असं लेखी दिलं होतं. तरीही कोरटकरला जामीन देण्यात आला. आता प्रशांत कोरटकरला ज्या अटींच्या आधारे जामीन मिळाला त्याचे उल्लंघन केल्यास त्याचा जामीन रद्द करण्यासाठी आम्ही प्रयत्न करु असंही असिम सरोदे म्हणाले

# अंबाजोगाईतील सकलेश्वर मंदिर राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित



अंबाजोगाई : महाराष्ट्र शासनाने अंबाजोगाई येथील ऐतिहासिक आणि प्राचीन सकलेश्वर महादेव मंदिर (बारारवांबी मंदिर) हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे या ऐतिहासिक मंदिराच्या संवर्धन आणि संरक्षणास चालना मिळणार असून पर्यटनासही चालना मिळणार आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी सकलेश्वर मंदिरास संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळविण्यासाठी सातत्याने राज्य शासनाकडे पाठपुरवा केला होता. त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत राज्य शासनाने या संदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. अंबाजोगाई येथील सकलेश्वर मंदिर १२व्या शतकातील यादवकालीन स्थापत्यशैलीचे उत्तम



उदाहरण मानले जाते. या मंदिराच्या परिसरात इतर पाच मंदिरांचे पुरावशेष व जवळपास ११८ प्राचीन शिल्पावशेष आढळले आहेत. तसेच, मंदिराच्या सभोवताली मजबूत बारा खांब असल्यामुळे त्याला ङ्गबारारवांबी मंदिरफ असेही संबोधले जाते. हे मंदिर अद्वितीय असून आपल्या स्वरूपातील मराठवाड्यातील एकमेव असे मंदिर असल्याचे राज्य शासनाने नमूद केले आहे. या मंदिराला ऐतिहासिक, स्थापत्य, धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मोठे महत्त्व आहे. येथे मोठ्या संख्येने भाविक भगवान शंकराच्या दर्शनासाठी येतात. शिवरात्री, श्रावण महिना आणि महाशिवरात्रीला येथे विशेष पूजेचे आयोजन केले जाते. अंबाजोगाईतील या प्राचीन वैभवाचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेत आ. नमिता मुंदडा यांनी सकलेश्वर मंदिरास राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी या संदर्भात शासनाला पत्रव्यवहार करून मंदिराच्या ऐतिहासिक महत्त्वावर भर दिला आणि संवर्धनाची मागणी केली. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे आणि अवशेष अधिनियम, १९६० अन्वये सकलेश्वर मंदिर राज्य संरक्षित स्मारक म्हणून जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार सकलेश्वर मंदिराचा ९,७३७ चौ. मीटर परिसर संरक्षित करण्यात आला असून त्यापैकी १९२ चौ. मीटर हे संरक्षित स्मारक क्षेत्र असणार आहे. यानिमित्ताने अंबाजोगाईचा ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार, पर्यटनमंत्री शंभूराज देसाई, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. मुंदडा यांनी आभार मानले आहेत. दरम्यान, सकलेश्वर मंदिराला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळाल्याने स्थानिक नागरिक, भाविक आणि इतिहासप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मंदिराच्या संरक्षणासाठी शासनाच्या या निर्णयाचे स्वागत होत आहे. या निर्णयामुळे मंदिराचे जतन आणि संवर्धन होणार असून, भविष्यात पर्यटन क्षेत्रातही मोठी भर पडणार आहे. मूळच्या आर्किटेक्ट असणाऱ्या आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यामुळे शक्य झालेला हा निर्णय सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी ऐतिहासिक ठरणार आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १० एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### पर्यावरणपूरक प्रकल्प, प्रगती की अधोगती?

निसर्गवेदफ जोपर्यंत आपल्याला कळत नाही तोपर्यंत आपल्याला या सजीव सृष्टीचे गणित समजणार नाही. यामुळेच या विषयात अनेक वर्षे अध्ययन करून, सृष्टी संशोधक म्हणून मी पीएच. डी. केली आणि याच विषयाच्या आनुषंगाने सरकारला ड्ढपर्यावरणपूरक शहर सौंदर्यीकरणफ प्रकल्प दिले. निसर्गवेदाचा अभ्यास करून केलेल्या या प्रकल्परचना सर्व सजीवसृष्टीला सुदृढ करणाऱ्या होत्या. २०१८-१९ पासून हे प्रकल्प सतत महाराष्ट्र सरकारला देत आहे. आम्ही अध्ययन करून तुम्हाला कळवतो अशी आश्वासन तेव्हापासून देण्यात आली. तेव्हा एक प्रश्न पडला जे अध्ययन करण्यास मला ३५ वर्षे लागली त्याचे अध्ययन इतक्या कमी वेळात हे कसे करतील? परंतु त्यानंतर कोणताही संवाद साधण्यात आला नाही. २०२२ पासून ते प्रकल्प सगळीकडे दिसायला लागले; परंतु त्याच्यात नकारात्मकता जास्त वरचढ होताना दिसत होती. उदाहरणार्थ अजीर्ण, असह्य होतील असे पोल डिझाईन आणि रंगरंगोटी ज्यांनी फक्त भिंती खराब केल्या, नको तेवढ्या पोलवरील लाईटच्या अपघाती गु ंडाळ्या (राज साहेब ठाकरेंच्या निरीक्षणानुसार आणि त्यांनी केलेल्या जाहीर टीकेनुसार निव्वळ बियर बार), मन विचलित करणारे भर रस्त्यांवरील डिव्हायडरमधील योगाच्या मूर्त्या, नको त्या ठिकाणी वृक्ष लागवड या वृक्ष रचनेमुळे अनेक पूल पडणे, रस्ते उखडणे असे अनेक अपघात होणार आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हजारो कोटींची जनतेच्या पैशांची बिनडोक उधळण. थोडक्यात काय तर कुणाचाच कुणाला मेळ नसणाऱ्या प्रकल्प रचना. मुळातच शहर सौंदर्यीकरण संकल्पना समजली की नाही हा फार मोठा प्रश्न आहे. या प्रकल्पांचा मूळ विषय फक्त हाताळण्यात आला; परंतु अभ्यासला गेला नाही. मुंबईला सुरक्षित करणारे वृक्ष हे मुळातच नैसर्गिकरीत्या येथे होते; परंतु या वृक्षांची छाटणी करून तेथे जे काही बांधकाम आणि प्रकल्प राबवण्यात आले आहेत, ते अतिशय धोकादायक आहेत. जे मुंबई बुडण्यासाठी पूरक आहेत. नैसर्गिक संरचनेला तडा देणाऱ्या या प्रकल्प योजना सर्वच जीवसृष्टीसाठी घातक आहेत. या सर्व सौंदर्यीकरणामध्ये नक्की काय साध्य झाले? रंगरंगोटी, नक्षी काढणे, वृक्ष लागवड करणे म्हणजे सौंदर्यीकरण नव्हे. मुळातच सौंदर्यीकरणाची संकल्पना चुकीची झाली आहे आणि त्याचे परिणाम किती भयंकर होणार आहेत याचा विचारच केला गेला नाही. एक सृष्टी संशोधक म्हणून एवढंच सांगू इच्छिते की, या प्रगतीच्या नावाखाली केलेल्या अतिरेकामुळे झालेला नैसर्गिक विध्वंस आता मानवी जीवन कसे उद्ध्वस्त करतो तेच पाहा. हिरव्यागार वनराईची जागा सिमेंटच्या जंगलांनी घेतली. साहजिकच दिवसेंदिवस उष्णता इतकी वाढणार की किती झाडे लावली तरीही ही उष्णता वाढतच राहणार. सुरुवात ही ऋतुमान बदलाने झालीच आहे; परंतु याचे पडसाद हे किती भयावह होतील हे दिवसेंदिवस तुम्हाला दिसतील. अति खोदकामांमुळे, नको त्या प्रकल्पांमुळे कमकुवत झालेल्या जमिनीची नैसर्गिक प्रक्रिया ही पूर्णपणे कमकुवत होणार. प्रदूषणाचा विळखा आहेच. समुद्राच्या भूगर्भात झालेल्या हालचालींमुळे ही जमीन समुद्र कधी गिळंकृत करेल तेही समजणार नाही. शिवाय समुद्रात असणारे अज्ञात जीव या जमिनीवर येतील ते वेगळेच. मुंबई बुडणार हा सर्वात मोठा मुंबईला धोका. पण मुंबई बुडण्यासाठी सध्याच्या प्रकल्प योजना या पूरक आहेत. मुंबईतून बाहेर पडण्यासाठी सुद्धा वाट राहणार नाही ही वस्तुस्थिती आहे. तुम्हाला सरकारी कामाचा काही अनुभव आहे का आणि नसेल तर आम्ही तुम्हाला प्रकल्प देऊ शकत नाही. ३ वर्षे तुम्हाला दुसऱ्यांच्या हाताखाली काम करावे लागेल तरच तुम्हाला प्रकल्प देऊ शकतो. याचा नक्की अर्थ काय? आज एक सृष्टी संशोधक असताना सुद्धा हे कर्णमधुर स्वर सरकारी कार्यालयात कानी पडले आहेत. दुर्दैव म्हणजे आमच्यासारख्या सृष्टी संशोधक आणि तज्ज्ञ यांच्या गुणवत्तेला या सरकारी प्रशासनामध्ये काही महत्त्व नाही का? सरकारी अधिकाऱ्यांसमोर आलेला प्रस्ताव बारकाईने तपासून अमलात आणणार नाहीत का? यामुळे खासगी संस्थांना सुद्धा या विकासकामात जर भाग घ्यायचा असेल तर अडथळे निर्माण होतात. योजना मांडणाऱ्यांना फक्त पायऱ्या झिजवाव्या लागतात. मंत्री महोदयांनी सांगून सुद्धा सरकारी अधिकारी त्यात लक्ष घालत नाहीत. हा अनुभव अनेकांना येतो त्यामुळे खासगी क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना नवीन कार्य करून दाखवण्याची संधी मिळतच नाही. कार्यालयातील या फाईली पुढे सरकतच नाहीत.

# अमेरिका असंतोषानंतर ट्रम्प भूमिका बदलतील का?

अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफविरोधात आज अमेरिकेत हजारो आंदोलक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी ट्र म्प यांच्याशिवाय एलॉन मस्क यांच्याविरोधातही घोषणा दिल्या. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाचा संताप आंदोलकांच्या घोषणांतून व्यक्त होत होता आणि ट्रम्प यांनी लागू केलेल्या नव्या दरवाढीमुळे जगभरातील स्टॉक मार्केट आज अक्षरशः कोसळले. सकाळी सुरुवात झाल्यापासूनच बाजार कोसळण्याचे संकेत मिळाले आणि त्यातून ट्रम्प यांच्या मनमानी धोरणाची झलक पाहायला मिळाली होतीच. आजचे आंदोलन हे ट्रम्प यांच्या प्रशासनाविरोधातील सर्वात मोठे आंदोलन होते हे अनेकांनी नमूद केले आहे आणि हे आंदोलन ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे अमेरिकन लोकांच्या मनातील राग यानिमित्ताने दिसून आला आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे केवळ जास्त कर द्यावे लागतात हा एकमेव मुद्दा नाही, तर हजारो लोकांच्या नोकऱ्या जाऊन ते बेरोजगार होणार आहेत. तसेच त्यांना निवृत्तीनंतर जे लाभ मिळत असतात त्यांना चांगलीच कात्री बसणार आहे. लोकांच्या मनातील राग हा आहे. अमेरिकेत मध्यमवयीन तसेच वृद्ध नागरिकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे निवृत्तीनंतरच्या लाभांना तेथे अत्याधिक महत्त्व आहे. पण ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे अमेरिकन नागरिकांना या लाभांवर पाणी सोडावे लागणार आहे. त्यामुळे लोक रस्त्यावर उतरले आहेत ही वस्तुस्थिती आहे. आंदोलनातील लोकांचा राग जसा वाढत आहे तशीच त्यामागील उत्स्फूर्तता वाढत आहे. अर्थात ट्रम्प यांच्यावर याचा परिणाम होणार नाही, कारण त्यांनी असे म्हटले आहे की, काही मिळवायचे असेल तर काही गमवावे लागतेच. अनेक जागतिक नेत्यांनी ट्रम्प यांच्याशी टॅरिफवर बोलणी केली आहेत आणि त्यात जपानचा समावेश आहे तसेच ब्रिटनचा समावेश आहे. पण ट्रम्प त्यांचे ऐकतील असे वाटत नाही, असे तज्ज्ञांना वाटते. ट्रम्प यांच्या धोरणाविरोधात सर्वप्रथम नॅशनल मॉल येथे निदर्शने आयोजित केली गेली आणि ती लाट हळूहळू सर्व जगभर पसरत आहे. इतर अनेक शहरांमध्ये असेच गट आंदोलन करत आहेत आणि त्यांचा रोख आहे तो ट्रम्प यांच्यावर. ट्रम्प, मस्क आणि अनेक अब्जाधीश मिळून आम्हाला बरबाद करू पाहत आहेत असा त्यांचा आरोप आहे. त्याला ट्रम्प यांनी काहीही उत्तर दिले नाही. ट्रम्प यांच्या रेसिप्रोकल टॅरिफमुळे जगाला हादरा बसला आहे तरीही भारतावर त्याचा सर्वात कमी परिणाम झाला आहे असे काहींचे म्हणणे आहे. त्याच्या टॅरिफमुळे जगभर शॉकवेव्हज निर्माण झाल्या आहेत हे निश्चित आहे; परंतु जागतिक बाजारपेठा मात्र धक्क्यात आणि गोंधळाच्या स्थितीत आहेत हे लपवून चालणार नाही. ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे मुक्त व्यापाराला धक्का बसला असला तरीही त्याचा धक्का अगदीच गंभीर जखमी करणारा नसेल असे काहींनी म्हटले आहे. पण अमेरिकेच्या टॅरिफ वॉरमुळे जागतिक बाजारावर त्याचा विपरित परिणाम होणार आहे हे निश्चित. या टॅरिफ वॉरमुळे फ्री ट्रेडला धक्का बसला असला तरीही त्यामुळे मोठे गु ंतवणूकदार खासगी इक्विटी विकून टाकण्याचा विचार करत आहेत, हे कोणत्याही बाजाराला धोकादायक आहे. सर्व जगभरात ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे लोक रस्त्यावर आले आहेत आणि त्यांना चिंता आहे ती आपल्या भवितव्याची. जागतिक बाजारपेठांमध्ये ट्रम्प यांच्या शुल्कामुळे प्रचंड आर्थिक उलथापालथ झाली आहे आणि त्यामुळे गुंतवणूकदारांना भीती किंवा भावनेने प्रेरित होऊन निर्णय न घेणे हीच आज सर्वात महत्त्वाची बाब बनली आहे. त्याला लोक कसे सामोरे जातात यावर ट्रम्प यांच्या या टॅरिफ योजनेचे यशापयश अवलंबून आहे. आर्थिक बाजारपेठ ही अनिश्चिततांनी भरलेली आहे, त्यामुळे कोणत्याही क्षणी कसलाही आततायी निर्णय न घेता आलेली परिस्थिती स्वीकारून शांतपणे निर्णय घेणे ही आजची जबाबदारी आहे हे ओळखून लोकांनी वागायला हवे. ट्रम्प यांच्या व्यापार करामुळे मु ंबई शेअर बाजारात उलथापालथ झाली आहे आणि तेथे शेअर्स कोसळले आहेत, त्यामुळे सेन्सेक्स २६०० अंकांनी कोसळला आणि ही मोठी पडझड आहे. निफ्टीचीही हवालदिल अवस्था झाली आहे आणि त्यामुळे सर्व क्षेत्रांतील गुंतवणूकदार हवालदिल झाले आहेत. त्यामुळे ट्रम्प यांचा निर्णय एकट्या अमेरिकेपुरता मर्यादित नाही, तर सर्व जगाला त्याचा फटका बसला आहे. ही अत्यंत दयनीय परिस्थिती आहे. यातून अमेरिकेतच नव्हे, तर जगभरात मंदी ओढवणार आहे. या परिस्थितीमुळे जगाला १९२९ च्या जागतिक मंदीची आठवण आली, तर नवल नव्हे. त्यावेळी अमेरिकेत अशीच मंदी आली होती आणि त्यानंतर अमेरिका कोसळली होती. तेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष होते हर्बर्ट हूव्हर. त्यांच्या काळात स्टॉक मार्केट कोसळले होते आणि कित्येकांनी आत्महत्या केल्या होत्या. आज एवढी परिस्थिती नसली तरीही अमेरिका आजही तितकीच दयनीय स्थितीत आहे हे या लोकांच्या आंदोलनामुळे सिद्ध झाले आहे. आज अमेरिकन जनता रस्त्यावर आहे आणि त्याचे पडसाद सर्व जगभर उमटत आहेत. आज अमेरिकेत करण्यात आलेली निदर्शने ही सर्वात मोठी होती, असे आता सांगण्यात येत आहे. पण ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे आणखी एक गंभीर परिणाम समोर आला आहे आणि तो म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेला धक्का बसला आहे. त्यामुळे धोक्याचे संकेत मिळाले आहेत. त्यातून जग कसे सावरणार हे आता प्रत्येक देशावर अवलंबून आहे. उद्योगांमध्ये घसरण झाली आणि प्रत्युत्तराच्या धमक्या यांची एक लाट आली आहे. त्यामुळे जगभर एक प्रतिस्पर्धेचे वातावरण निर्माण झाले आहे आणि चीनने अमेरिकेवर गुंडगिरी केल्याचा आरोप केला, तर युरोपियन युनियनने अमेरिकेवर तसेच कर लावण्याची धमकी दिली आहे. व्यापार युद्ध आणि शुल्क युद्धामध्ये कुणीही विजेता नसतो असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते म्हणाले, ते तंतोतंत सत्य आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांनी अमेरिकेला आपला टॅरिफ मागे घेण्याचे आवाहन केले आहे. अर्थात अमेरिका ते मानणार नाही हे सत्य आहे. त्यामुळे या युद्धात फक्त जगच नव्हे तर अमेरिकाही होरपळणार आहे. पण ट्रम्प यांच्यासारख्या हट्टी नेत्याला हे सांगणार कोण अशी परिस्थिती आह

# चौसाळा ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी २४ कोटींचा निधी मंजूर

## प्रशासकीय मान्यता मिळाली; उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले आभार

बीड (प्रतिनिधी) दि.९ : तालुक्यातील चौसाळासह परिसरातील आरोग्य सुविधांमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. यासाठी राज्य सरकारकडून २४ कोटी ४५ लक्ष ६३ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून बुधवारी (दि.९) अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निधीतून ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम होणार आहे. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रयत्नातून हा निधी मंजूर झाला आहे. त्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे आभार मानले आहेत. चौसाळा येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी आणि जागा उपलब्धतेसाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सातत्याने पाठपुरावा केलेला होता. आता त्यांच्या मार्गदर्शनाखाली निधीसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला आहे. भरीव निधी प्राप्त झाल्यामुळे चौसाळा परिसरातील हजारो नागरिकांना दर्जेदार आणि आधुनिक वैद्यकीय सुविधा स्थानिक पातळीवरच मिळू शकणार आहेत. आतापर्यंत अनेकवेळा रुग्णांना प्राथमिक उपचारासाठी जिल्हा रुग्णालय गाठावे लागत होते. मात्र,



ग्रामीण रुग्णालय स्थापन झाल्यानंतर विविध उपचार, तपासण्या व तातडीच्या सेवा याठिकाणीच उपलब्ध होतील. या रुग्णालयासाठी निधी मिळवण्यासाठी डॉ.योगेश



क्षीरसागर यांनी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. विविध स्तरावर पाठपुरावा करून त्यांनी ही मागणी शासनदरबारी मांडली होती. त्यांच्या या प्रयत्नांना आता यश आले असून, त्यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विशेष आभार मानले आहेत. या निर्णयामुळे चौसाळा परिसरातील आरोग्यसेवा क्षेत्रात मोठी क्रांती होणार असून, गावातील नागरिकांबरोबरच आजूबाजूच्या भागातील लोकांनाही त्याचा लाभ मिळणार आहे. लवकरच कामाला सुरुवात होणार असून, येत्या काही महिन्यांत ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम व सुविधा उभारणीचे काम वेगात सुरू होईल, अशी माहितीही मिळत आहे.

# पत्रकारितेला जनसुरक्षा कायद्याचा फटका बसणार नाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा शब्द पत्रकार संघटनांबरोबर मुख्यमंत्र्यांची बैठक

विशेष प्रतिनिधी: बालाजी सिरसाट

मुंबई : महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकातील तरतुदींवर विविध पत्रकार संघटनांनी घेतलेल्या आक्षेपाची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. महाराष्ट्रातील विविध १२ संघटनांनी एकत्रित येत पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंच स्थापन केला होता. या मंचाची आज सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत प्रदीर्घ चर्चा झाली.पत्रकार अभिव्यक्ती मंचच्या वतीने एस.एम.देशमुख, संदीप चव्हाण, दिलीप सपाते, यदु जोशी, विशाल सिंग, पंकज दळवी, इंद्रकुमार जैन, प्रदीप मैत्रा, दीपक भातूसे, श्रीकिशन काळे यांनी या मसुद्यातील विविध मुद्यांवरील पत्रकार संघटनांचे असणारे आक्षेप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.हा कायदा म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ला असल्याचे प्रथमदर्शनी मत समाजाच्या सर्वच स्तरावर बनले असल्याकडेही पत्रकारांनी मुख्यमंत्री फडणवीसांचे लक्ष वेधले. या विधेयकाची ही प्रतिमा निर्माण झाली



असेल तर ती दूर करण्याचे सर्वोतपरी प्रयत्न शासकीय पातळीवरून केले जातील असे सांगतानाच या विधेयकामुळे कुणाच्याही व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घातला जाणार नाही, आणि पत्रकरांच्या निर्भीड पत्रकारितेला या विधेयकाचा कोणताही फटका बसणार नाही असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला. मुळात शहरी नक्षलवाद संपुष्टात आणण्यासाठी हा कायदा बनविला जात आहे. हा कायदा कुणा व्यक्तीच्या विरोधात नसुन तो नक्षली प्रवृतींना बळ देणाऱ्या संघटनांच्या विरोधात राबवविला जाणार आहे. त्यामुळे बंदी घातलेल्या संघटनांच्या आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या संदर्भातच हा कायदा लागू होणार आहे असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.हा कायदा याआधी छत्तीसगड, तेलंगणा आणि ओरिसासारख्या नक्षलग्रस्त राज्यात लागू झालेला आहे. पण महाराष्ट्रात हा कायदा अस्तित्वात नाही. त्यामुळे या सगळ्या नक्षली संघटनांची मुख्य कार्यालय ही महाराष्ट्राच्या नक्षल भागात थाटली जात आहेत. या नक्षली कारवायांना पायबंद घालण्यासाठी अशा कठोर कायद्यांची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले. या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी तीन सदस्यीय न्यायाधिशांची समिती गठीत केली जाणार असून त्यांच्या मान्यतेनंतरच या कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. त्यामुळे या कायद्याचा दुरूपयोग होऊ शकणार नाही असेही फडणवीस यावेळी म्हणाले. त्यातही काही मुद्द्यांवर जर पत्रकार संघटनांच्या सुचना असतील तर त्या त्यांनी लेखी द्या त्याचा अंतिम मसुदा करताना नक्की विचार करू असे आश्वासनही फडणवीस यांनी यावेळी दिले. या बैठकीला मुंबई मराठी पत्रकार संघ, मराठी पत्रकार परिषद, मुंबई प्रेस क्लब, विधीमंडळ वार्ताहर संघ, अधिस्विकृती पत्रकार समिती, टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन, बृहन्मुंबई यूनियन ऑफ जर्नालिस्ट, बृहन्मुंबई महानगरपालिका वार्ताहर संघ, मुंबई क्राइम रिपोर्टर असोसिएशन, पुणे श्रमिक पत्रकार संघ, मुंबई हिंदी पत्रकार संघ, नॅशनल यूनियन जर्नालिस्ट ऑफ इंडिया आणि जर्नालिस्ट यूनियन ऑफ महाराष्ट्र आदी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पांदणसाठी मिळणार माती, मुरूम



शेतकऱ्याला शेतापर्यंत पोहोचण्यासह कृषी यंत्रसामग्री सहज वाहून नेता यावी यासाठी पांदण रस्ते अत्यंत महत्त्वाचे असतात. मात्र, अनेक ठिकाणी या रस्त्यांची दुरवस्था झाली असून शेतकऱ्यांना शेतीत जाण्यास अडचणी येतात. याच पार्श्वभूमीवर सरकारने ममातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते योजनाफ राबविण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय ३ एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. राज्यातील शेतकरी, घरकूल लाभार्थी आणि शासकीय बांधकामांसाठी शेततळी, पाझर तलाव, महसुली नाले आणि बंधाऱ्यांमधून निघणारा गाळ, माती, मुरूम आणि दगड विनामूल्य मिळणार आहे. या निर्णयामुळे शेतरस्ते सुधारण्यासाठी लागणारा मुरूम आणि माती शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होईल. ज्यामुळे शेतीला जोडणारे रस्ते मजबूत होतील महामार्गाएवढेच शेतरस्ते महत्त्वाचे आहेत. महामार्ग विकसित करण्यासारखेच शेतरस्त्यांच्या विकासालाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. शेतापर्यंत रस्ता असल्यास शेतमाल वाहतूक करणे सोपे होते आणि शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या अवजड यंत्रसामग्रीचा वापरही सहज शक्य होतो. शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतांमध्ये जाण्यासाठी सोपा मार्ग उपलब्ध होणार आहे. शेतीचे उत्पादन आणि कार्यक्षमता वाढणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचे अर्थकारण बळकट होईल आणि गावांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल. हा निर्णय शेतकरी, ग्रामपंचायती आणि संपूर्ण कृषी क्षेत्रासाठी मोठा दिलासा देणारा ठरणार.

दैनिक लोकआरंभ लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १० एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# ४० हजार रुपयांसाठी महिलेचा मृतदेह ६ तास अडवून ठेवला,आंदोलनाचा इशारा देताच,काय घडले पाहा ?

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये अनामत रक्कम भरली नाही म्हणून उपचार बुलढाण्यातील मलकापुर शहरातील हकिमी मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटलमध्ये एका रुग्णाचा मृतदेह चाळीस हजार रुपयांसाठी तब्बल सहा तास अडवून ठेवण्याची घटना घडली आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतून शस्त्रक्रिया होऊन मृत्यू पावलेल्या एका महिला रुग्णांच्या बाबतीत हा धक्कादायक प्रकार घडला आहे. या संदर्भात शिवसेना ठाकरे गटाने आंदोलनाचा इशारा देताच अखेर या महिलेचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला



आहे.मलकापूर तालुक्यातील शिराढोण येथील कमलबाई यादव इंगळे या घरात पाय घसरून पडल्याने त्यांचा डावा हात आणि पाय फ्रॅक्चर होऊन त्या जखमी झाल्या होत्या. त्यांना मलकापूर येथील हकिमी मल्टी स्पेशालीस्ट हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी ५ एप्रिल रोजी दाखल केले होते. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतून ७ एप्रिल रोजी रात्री त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णालयात उपचार सुरु असतांना बुधवारी सकाळी ४ वाजताच्या दरम्यान हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचा मृत्यू झाला. मात्र रुग्णालय प्रशासनाने ४० हजार रुपये बिल बाकी असल्याचे सांगत त्यांचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यास नकार दिला.

### रुग्णालयाने आरोप फेटाळले !

वारंवार विनवणी करूनही मृतदेह ताब्यात देत नसल्याने रुग्णांचे नातेवाईक यांनी या घटनेची माहिती शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. याबाबत मात्र हॉस्पिटल प्रशासनाने या आरोपांचे खंडन केल आहे. या महिलेची अनेक कागदपत्रं जमा करणे बाकी होते आणि या महिलेचे राज्य शासनाकडून अप्रुव्हल घेणे बाकी असल्याने कागदी प्रक्रिया करण्यास वेळ लागला. त्यामुळे मृतदेह देण्यास विलंब झाल्याचा दावा हॉस्पिटल प्रशासनाने केला आहे. मात्र आम्ही रुग्णाच्या नातेवाईकांकडे चाळीस हजार रुपये मागितलेले नाहीत असे रुग्णालयाचे कार्यकारी अधिकारी अनुप मालपाणी यांनी म्हटलं आहे.

# कुलर वापरताना विद्युत सुरक्षेची घ्या काळजी-महावितरणाचे अवाहन

पिंपळनेर तापमान वाढल्याने कुलरचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे. मात्र खबरदारी न घेतल्याने अपघाताची शक्यता असते. त्यासाठी नागरिकांनी कुलर वापरताना विद्युत सुरक्षेची खबरदारी घ्यावी, असे आवाहन पिंपळनेरच्या विद्युत महावितरणने केले आहे. कुलरसाठी नेहमी थ्रीपिन प्लगचा वापर करावा. कुलरमध्ये पाणी भरण्यापूर्वी कुलरचा वीजपुरवठा बंद करून प्लग काढून ठेवावा म्हणजे कुलरचा विजेशी काहीही संबंध राहणार नाही. पाणी भरल्यानंतर प्लग पिन लावून स्विच चालू करावे. त्यानंतर कुलरच्या कुठल्याही भागाला स्पर्श करू नये. कुलरचे कनेक्शन व वायरिंग अधिकृत कारागिराकडून तपासून घ्यावे. अर्थिंगची तपासणी करून घ्यावी. अर्थिंग व्यवस्थित असल्यास लिकेज करंट येत नाही. लहान मुलांना नेहमी कुलरपासून सुरक्षित अंतरावर ठेवावे आणि ती कुलरजवळ खेळणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी. कुलरच्या लोखंडी बाह्यभागात वीजप्रवाह उतरू नये यासाठी कुलरचा थेट जमिनीशी संपर्क येईल, अशी व्यवस्था करावी; जेणेकरून कुलरच्या लोखंडी बाह्यभागात वीजप्रवाह उतरल्यास त्याचा धक्का बसणार नाही. पाण्याचा पंप ५ मिनिटे सुरू आणि १० मिनिटे बंद ठेवणाऱ्या इलेक्ट्रिक सर्किटचा वापर करावा. यामुळे विजेचीही बचत शक्य आहे.

# ऊन वाढल्याने शाळांच्या वेळेत बदल सकाळच्या सत्रात भरु लागल्या शाळा




पिंपळनेर उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. खबरदारीचा उपाय म्हणून दुपारच्या सत्रातील शाळांची वेळ बदलण्यात आली आहे. आता सकाळच्या सत्रात शाळा भरत असून दुपारी सव्वाबारा वाजेपर्यंत वर्ग सुरू राहणार ने आहे. याबाबत शासनाचे आदेश आहेत. बीड तालुक्यातील पिंपळनेरसह सह परिसरात प्रत्येक गावी जिल्हा परिषद सह , खासगी शाळा आहेत. यामधील काही शाळा सकाळच्या सत्रात तर काही शाळा दुपारच्या वेळेत भरत होत्या. मात्र, सध्या मोठ्या प्रमाणावर उन्हाची तीव्रता वाढली आहे. तापमान ४० अंशाच्यावर जात असून त्याचा विपरित परिणाम मुलांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता आहे. या कडक उन्हामध्ये चक्कर येणे, धाप लागणे, ताप येणे तसेच अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे आढळतात. तसेच उष्माघाता चा त्रास होऊन मुलांच्या जीवावर बेतण्याची शक्यता आहे. उष्णतेच्या लाटे चा विपरित परिणाम टाळण्यासाठी सर्व खासगी व जिल्हा परिषदेच्या शाळा या सकाळच्या सत्रात भरत आहेत

# मी शरद पवारांना काल ही दैवत मानत होतो, आज ही मानतो पण:, अजितदादांचं मोठं वक्तव्य

आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी -चिंचवडमध्ये बोलताना चौफेर फटकेबाजी केल्याचं पाहायला मिळालं. ते विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या नागरी सत्कार सोहळ्यात बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मी शरद पवार यांना काल ही दैवत मानत होतो, आज ही दैवत मानतो, पण तळ्यात मळ्यात केल्यास निर्णय घेता येत नाहीत असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. नेमकं काय म्हणाले अजित पवार? अण्णा बनसोडे हे गरीब कुटुंबातील कार्यकर्ते आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगून अण्णा बनसोडे यांना विधासभा उपाध्यक्ष केलं. पान टपरी चालवणारे अण्णा आता आमदार आहेत, आधी नगरसेवक होते, आता उपाध्यक्ष झाले आहेत. अण्णा बनसोडे यांना अपयश आले, तेव्हा, गौतम चाबुकस्वार आमदार झाले. परंतु त्यांनी हार मानली नाही, ते पुन्हा आमदार झाले. 1991 ला मी इथे आलो तेव्हा गाववाले आणि



बाहेरचे अशी चर्चा खूप व्हायची, पण आता अण्णा बनसोडे हे देखील इथलेच झाले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांच्या टेरिफ धोरणामुळे जागतिक बाजारपेठेत खळबळ उडाली आहे. जगातील अनेक देश अमेरिकेत निर्यात करत आहेत. त्यांना याचा फटका बसत आहे. कोविड नंतरचं हे सर्वात मोठं संकट आहे. याला बाजूला सारून आपल्याला पुढे जायचं आहे. माझ्या हातात हे शहर होतं. महापौर, विरोधी पक्षनेते, हे सर्व मी करायचो, माझा स्वार्थ मी कधी बघितला नाही. जनतेचा विकास करण्याचा हेतू डोळ्यासमोर ठेवला. नदी, कचरा हा महत्वाचा प्रश्न आहे. याबाबत काही जणांचं वेगळं म्हणणं आहे. त्यांच्या बोलण्यात तथ्य असेल तर आणि जनतेच्या अडचणीच ठरणार असेल तर एक पाऊल पुढे मागे टाकू, असंही यावेळी अजित पवार यांनी म्हटलं आहे.

## करुणा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्यातील संबंध हे लग्नासारखेच : मुंबई सत्र न्यायालय

करुणा मुंडे (Karuna Munde) आणि धनंजय मुंडे (Dhanajay Munde) यांच्यातील संबंध हे लग्नासारखेच आहेत, असे माझगाव सत्र न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे. माजी मंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांनी कौटुंबिक न्यायालयाच्या निकालाला आव्हान देत सत्र न्यायालयात याचिका दाखल केली होती. ही याचिका माझगाव सत्र न्यायालयाने फेटाळून लावली होती. न्यायालयाच्या याच आदेशाची सविस्तर प्रत आता समोर आली आहे. याच सविस्तर प्रतीमध्ये करुणा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्यातील संबंध हे लग्नासारखेच आहेत, असं माझगाव सत्र न्यायालयाने म्हटले आहे.माझगाव सत्र न्यायालयाने नेमकं काय म्हटलं?
करुणा मुंडे यांना 2 लाख रुपयांची पोटगी देण्याचा निकाल वांद्रेच्या कौटुंबिक न्यायालयाने दिला होता. याच निर्णयाला धनंजय मुंडे यांनी याचिकेच्या माध्यमातून आव्हान दिलं होतं. हीच याचिका फेटाळून माझगाव सत्र न्यायालयाने 5 एप्रिल रोजी निकाल दिला होता. या निकालाची प्रत आता समोर आली आहे. या निकालात दोघांनी 2 मुलांना जन्म दिला. हे एकाच घरात राहिल्याशिवाय शक्य नाही, असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं आहे. करुणा मुंडे दिलासा मिळण्यास पात्र-कोर्ट आपल्या याचिकेत करुणा मुंडे यांच्याशी लग्न केलं नसल्याचा धनंजय मुंडे यांनी दावा केला होता. मात्र धनंजय मुंडे व करुणा मुंडे यांच्यातील संबंध हे वैवाहिक स्वरुपाचे आहेत. त्यामुळे करुणा या घरगुती हिंसाचार कायद्यांतर्गत दिलासा मिळण्यास पात्र आहेत, असं सत्र न्यायालयाने आपल्या निकालात म्हटलं आहे. तसेच एका प्रसिद्ध नेत्याची जीवनशैली लक्षात घेऊन दंडाधिकाऱ्यांनी करुणा मुंडे यांना अंतरिम देखभालीचा दिलेला आदेश योग्यच आहे.

## सुप्रिया सुळेंचं रस्त्यासाठी उपोषण,

पुणे जिल्ह्यातल्या भोर तालुक्यातील श्री क्षेत्र बनेश्वर येथील रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. या रस्त्यासाठी आज खासदार सुप्रिया सुळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भर उन्हात उपोषण केलं. काही वेळानंतर हे उपोषण मागे घेण्यात आलं, यावरून आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाव न घेता सुप्रिया सुळे यांना टोला लगावला आहे.नेमकं काय म्हणाले अजित पवार? पुण्यामधल्या रस्त्यासाठी उपोषणाला बसलेल्या सुप्रिया सुळे स्टंटबाजी करतात का? असा प्रश्न उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विचारला असता नो कॉमेंट्स म्हणत अजित पवार यांनी यावर उत्तर देणं टाळलं. पण त्याच वेळेस हा रस्ता अवघा 600 मीटरचा आहे आणि रस्ता व्हावा ही इच्छाच असेल तर तो खासदार निधीतून करता येऊ शकतो असं म्हणत त्यांनी यावेळी अप्रत्यक्षरीत्या सुप्रिया सुळे यांना टोला देखील लगावला आहे. पिंपरीमध्ये विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या नागरी सत्कारासाठी आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

# गेवराईत जिल्हा वाहतुक शाखेची नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई

जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनखाली आज जिल्हा वाहतुक शाखेने गेवराई येथे नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई केली यावेळी ९३ केसेस आणि ६५ हजार रुपयांचा दंड वाहनधारकांना ठोठावला तसेच रोख ८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.याबाबत माहिती अशी की, बीड जिल्ह्यात पोलीस अधिक्षक नवनीत सर यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत तसेच सरकारी नियमांचे पालन करण्यासाठी देखील नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर जरब बसावा या करिता कार्यवाही सुरु आहे आज जिल्हा वाहतुक शाखेने मोटार वाहन कायद्या अंतर्गत गेवराई येथील शिवाजी चौक, बस स्टॅन्ड परिसर येथे जिल्हा वाहतुक शाखा आणि गेवराई वाहतुक शाखा ही जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय,गेवराई पोस्टचे पोलीस निरीक्षक प्रविण, पोलीस हवालदार शांतीलाल, दत्ता पोलीस आजिनाथ, पोलीस हवालदार पांडुरंग चालक पोलीस हवालदार राम पोलीस हवालदार नारायण गेवराई पोस्टचे पोलीस हवालदार विजय, किरण यांनी दुपारी ११ ते १ च्या दरम्यान गेवराईत विविध कलमांतर्गत लायसन्स नसणे, विमा नसणे, काळी काच, नो पार्किंग, ट्रिपलसीट या सदराखाली एकुण ९३ केसेस आणि ६५ हजार रुपयांचा दंड वाहनधारकांना ठोठावला तसेच रोख ८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

# तर तुमच्या दवाखान्याची राख करेन, शिवसेनेच्या आमदाराचा संताप, ऑडिओ क्लिपमध्ये काय ?

सध्या पुणे शहरातील प्रसिद्ध दीनानाथ मंगेशकर रुग्णालय हे चर्चेत आहे. या रुग्णालयाचा हलगर्जीपणामुळे गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याचे प्रकरण सध्या तापले आहे. त्यातच आता अकोल्यातही असाच काहीचा प्रकार समोर आला आहे. अकोल्यातील एका खासगी रुग्णालयाने डिपॉझिट न भरल्याने रुग्णाला व्हेंटिलेटर नाकारल्याचा आरोप होत आहे. आता याप्रकरणी शिवसेना आमदार संतोष बांगर यांनी खासगी रुग्णालयाच्या व्यवस्थापनाला चांगलेच झापल्याचे समोर आले आहे. त्यांची एक कथित ऑडिओ क्लिपही व्हायरल झाली आहे. नेमकं काय घडलं? मिळालेल्या माहितीनुसार, अकोल्यातील एका कार्यकर्त्यांने आमदार संतोष बांगर यांना फोन करून एका खासगी रुग्णालयाबद्दल तक्रार केली. हे रुग्णालय त्या कार्यकर्त्याच्या नातेवाईकांना दाखल करून घेण्यास नकार देत असल्याची तक्रार त्यांनी केली.



यानंतर आमदार संतोष बांगर यांनी तातडीने रुग्णालयाच्या व्यवस्थापकाला फोन केला. त्यांची ही ऑडिओ क्लिप व्हायरल झाली. व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लिपमध्ये आमदार संतोष बांगर रुग्णालयाच्या व्यवस्थापकाला खडसावत असल्याचे ऐकू येते. “तुमचं हॉस्पिटल कोणतं? तुम्ही या पद्धतीने करता का? लोकांकडे पैसे नसतील तर तुम्ही व्हेंटिलेटरवर पेशंटला घेत नाही? पैसे दिल्याशिवाय पेशंटला व्हेंटिलेटरवर घेत नाही, असं म्हणता? पेशंटला जर कमी जास्त झालं, तर तुमच्या दवाखान्याची राख करेन, लक्षात ठेवा.” अशा शब्दात संतोष बांगर यांनी रुग्णालयाला दम दिला. संतोष बांगर आणि रुग्णालयाच्या व्यवस्थापनाचे संभाषण काय? संतोष बांगर – हॅलो, आमदार बांगर बोलतोय? कोण बोलतंय? खासगी रुग्णालय – हा सर बोला संतोष बांगर – तुमचं हॉस्पिटल कोणतं? तुम्ही यापद्धतीने करता का? लोकांकडे पैसे नसतील तर तुम्ही व्हेंटिलेटरवर पेशंटला घेत नाही? पैसे दिल्याशिवाय पेशंटला व्हेंटिलेटरवर घेत नाही, असं म्हणता? संतोष बांगर – पेशंटला जर कमी जास्त झालं,

# सैफ अली खान हल्ल्याप्रकरणी आरोपीची जामिनीच्या अर्जाबद्दल महत्त्वाची अपडेट, पोलिसांनी केली मोठी मागणी

बॉलीवूड अभिनेता सैफ अली खानला १६ जानेवारी रोजी जीवघेणा हल्ला झाला होता. सैफ अली खान याच्या वांद्रे (पश्चिम) घरी घुसून एका दरोडेखोराने त्याच्यावर हल्ला केला होता. या हल्ल्यात अभिनेता गंभीर जखमी झाला होता. दरोडेखोरांशी झालेल्या झटापटीत सैफच्या मानेला व मणक्याला दुखापत झाली होती. या घटनेनंतर त्याच्यावर लीलावती रुग्णालयात उपचार सुरू होते. या जीवघेण्या हल्ल्यानंतर पाच दिवसांनी सैफ अली खानला डिस्चार्ज देण्यात आला होता. आता याप्रकरणी एक मोठी अपडेट समोर आली आहे.
सैफ अली खानवरील हल्ल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपी मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजादच्या जामीन अर्जावर येत्या १७ एप्रिल रोजी सुनावणी होणार आहे. मुंबई सत्र न्यायालयात ही सुनावणी पार पडणार आहे. मोहम्मद शरीफुलला जामीन देण्यास मुंबई पोलिसांनी कडाडून विरोध केला आहे. मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजाद हा बांगलादेशी नागरिक असून तो अनधिकृतपणे भारतात वास्तव्यास आहे. त्याने जामिनासाठी मुंबई सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. या अर्जाला उत्तर देताना पोलिसांनी जोरदार विरोध केला आहे.

# चैत्र उन्हातून नारायणगडावर भाविकांचा महासागर उसळला, भाविकांना नारळी सप्ताहाची उत्सुकता

कोळगांवश्री क्षेत्र नारायणगड संस्थान येथे दर महिन्याच्या एकादशीनिमित्ताने संत कुलभूषण नगद नारायण आणि विठ्ठल रखुमाई दर्शनासाठी मोठ्या स्वरूपात भक्तांचा जनसागर उसळत असतो. दरम्यान चैत्र महिन्यातील कामदा एकादशीच्या निमित्ताने म्हणजे दि. ०८ एप्रिल २०२५ रोजी नारायणगड वर चैत्र महिन्याच्या कडक उन्हातून भाविकांचा महासागर उसळला. याचबरोबर राक्षसनुवन तांबे (ता. शिरूर कासार) होणाऱ्या नारळी सप्ताहाची चर्चा दिसत होती. दरम्यान दि.१० एप्रिल २०२५ रोजी सुरू होणाऱ्या नारळी सप्ताहाची जय्यत तयारी नियोजनच्या भाविकांना मोठी उत्सुकता लागली. बीड जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र असणारे नारायणगड येथे दर महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीनिमित्त महाराष्ट्र
राज्यभरातील जिल्ह्यामधून गांवागावातून भाविक भक्त, वारकऱ्यांच्या शेकडो दिंड्या, टाळ मृदंगाच्या गजराने व विठ्ठल नामाच्या जयघोषाने लाखो भाविक दर्शन घेतात. दि.०८ एप्रिल २०२५ रोजीच्या कामदा एकादशी निमित्ताने भल्या पहाटपासून भाविकांच्या रांगा दिवसभर चैत्र शुद्ध महिन्याच्या कडक उन्हात ही भाविकांचा महासागर उसळला. गडावर लहान थोर मुल महिला वारकरी यांच्या हाती भगवा पताका झेंडा घेवून टाळ मृदंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात वैष्णव भक्तांची मांदीयाळी गडावर जमली होती.भल्या पहाटे ०२ वाजता विधिवत महापूजा संपन्न झाली. या भाविक भक्तांच्या गर्दीने श्रीक्षेत्र नारायणगड नगरी मोठ्या उत्साहात दिसत होती. दिवसभर गडावर दर्शनासाठी वाहनाची मोठ्या प्रमाणात ये जागत होती रात्री उशिरापर्यंत भाविकांचा गडावर दर्शनासाठी ओघ चालूच होता. नगदनारायण महाराज यांच्या पादुका हेलिकॉप्टर ने नेणार नारायणगड चा नारळी सप्ताहाची भाविकांना मोठी पर्वणी असते. जसे संत कुलभूषण




नगद नारायण महाराज यांच्या जन्मस्थळी सुरळेगाव च्या नारळी सप्ताहात नारायण महाराज यांच्या पादुका हेलिकॉप्टर ने नेण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे दि.१० एप्रिल रोजी राक्षसनुभव येथील नारळी सप्ताहात संत कुलभूषण नगद नारायण महाराज यांच्या पादुका नेण्यात येणार असून याचबरोबर गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज, संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांना हेलिकॉप्टर मधून नेण्यात येणार आहे असे आमचे प्रतिनिधी बाळासाहेब घाडगे यांच्याशी बोलताना सांगितले. रासनुभवन ग्रामस्थांचे देखणे नियोजन दरम्यान नारायणगड संस्थान चा ७३ वा नारळी सप्ताह मठाधिपती हभप महंत शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते उत्तराधिकारी हभप संभाजी महाराज, हभप भानुदास महाराज शास्त्री गोमळवाडा यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१० एप्रिल २०२५रोजी पासून शिरूर कासार तालुक्यातील मौजे राक्षसनुभवन तांबे, विघनवाडी, खोलेवाडी, पिंगळे वाडी ग्रामस्थांच्या वतीने मोठ्या उत्साहात देखणे नियोजन होणार आहे. तसेच राक्षसनुभवनचा १५० वा अखंड हरिनाम सप्ताह वर्ष आहे. सुमारे दोनशे एकराहून अधिक कार्यक्रमाचा मंडप, भव्य दिव्य नियोजन करण्यात आले आहे. आकर्षक देखावे, भव्य दिव्य मिरवणूक, झांज पथक ढोली पथक, लेझीम पथक असे स्वागतासाठी मठाधिपती ह भ प प्रेम मूर्ती शिवाजी महाराज, मनोज जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी आयोजकांनी नियोजन केले आहे. महाप्रसाद, अन्नदान, पार्किंग पाणी, वाहतुक, स्वच्छता कार्यक्रम व्यवस्था, अश्या विविध प्रकारचे नियोजन केले आहे. यामुळे या नारळी सप्ताहाची आणि ग्रामस्थांकडून तयारीची चर्चा, नारायणगड संस्थानासह संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये होत आह

# सूर्य आणखी तळपणार हवामान खात्याकडून धोक्याचा इशारा

राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद विदर्भातील शहरांमध्ये केली जात असून गेल्या तीन दिवसांपासून सातत्याने तापमानाचे नवे उच्चांक गाठले जात आहेत. पारा सातत्याने वाढतच चालल्यामुळे वाढत्या उन्हात नागरिकांची होरपळ होत आहे. दरम्यान, प्रादेशिक हवामान खात्याने येत्या दोन दिवसात उष्णतेच्या तीव्र लाटेचा इशारा दिला आहे. भारतीय हवामान खात्याने ३१ मार्चच्या पत्रकार परिषदेत यावर्षी संपूर्ण देशात सरासरीपेक्षा अधिक तापमान राहील व मध्य भारतात याचा अधिक प्रभाव राहील, असे सांगितले होते. हा अंदाज खरा ठरत आहे. त्यात विदर्भात सध्या सरासरीच्या चार अंश सेल्सिअसपर्यंत पेक्षा जास्त तापमान आहे. विदर्भातील सर्वच शहरांमधील तापमान ४० अंश सेल्सिअसपलीकडे पोहोचले आहे. गेल्या तीन दिवसांपासून त्यात सातत्याने वाढ होत असूनअकोलाशहरात सर्वाधिक ४४.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद सोमवारी करण्यात आली. इतरही शहरांमध्ये ४१, ४२, ४३ अंश सेल्सिअसपलीकडे तापमान केले आहे. त्यामुळे प्रशासनाने खबरदारीचे आवाहन केले आहे आता बुधवारी, नऊ एप्रिलला आणि गुरुवारी दहा एप्रिलला विदर्भातील अकोला, बुलढाणा, अमरावती,यवतमाळ, नागपूर या जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच पुढील दोन ते तीन दिवसांत राज्यातील अनेक भागात कमाल तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता वर्तवली आहे. राज्याची उपराजधानी आणि विदर्भाची राजधानी अशी ओळख असलेल्या नागपूर शहरात देखील कमाल तापमानाचा पारा सोमवारी ४२ अंश सेल्सिअसवर पोहोचला. येत्या काही दिवसात तो ४५ अंश सेल्सिअस गाठण्याची देखील शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे हवामान खात्याचा अंदाज खरा ठरण्याची शक्यता आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १० एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# राज्य मंत्रिमंडळाचे ९ मोठे निर्णय, आता घरांसाठी फक्त कृत्रिम वाळू, झोपडपट्टी पुनर्वसनासाठीही महत्त्वाची सुधारणा!

आज (8 एप्रिल) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यातील काही निर्णयांबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली आहे. त्यांनी सांगितल्यानुसार आता राज्यभरातील घरकुलांसाठी 5 ब्रासपर्यंत मोफत वाळू मिळणार आहे. तसेच शिंधी समाजाला त्यांची घरे आणि व्यावसायिक प्रतिष्ठाने कायदेशीर करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. ते आज मुंबईत माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.राज्यातील घरकुलांना आपण पाच ब्रास मोफत वाळू देणार आहोत. प्रत्येक वाळूघाटात 10 टक्के आरक्षण हे घरकुलांसाठी असेल. ज्या ठिकाणी पर्यावरण मंजुरी नाही, त्या ठिकाणी स्थानिक ग्रामंपचायती यांनीही पुढची कारवाई कारवाई करायची आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले आहे.

मुंबईः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची रणनीती ठरली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार सोमवार, मंगळवार, बुधवार मुंबईत शासकीय कामकाज पाहणार असल्याची माहिती समोर आली आहे. तर उरलेले ४ दिवस अजित पवार महाराष्ट्र दौरा करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मंत्री, विधान परिषद आमदार यांना देखील राज्यभरातील दौऱ्यांचं शेड्युअल तयार करून तत्काळ पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना कळवण्याचे आदेश अजित पवारांकडून देण्यात आले आहेत. सदर दौऱ्यांच्या दरम्यान पदाधिकारी मेळावे, सदस्य नोंदणी, बूथ बांधणी आणि संघटन वाढवण्याच्या सूचना देखील अजित पवारांनी दिल्या आहेत. मंगळवारी (८ एप्रिल) पार



पडलेल्या आमदार पदाधिकारी बैठकीत अजित पवारांनी या सूचना दिल्या. तसेच वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या मंत्र्यांना देखील एकदा दोनदा चूक झाली, तर समजून घेऊ...मात्र तिसऱ्या वेळी माफी नाही तर मंत्रिपद बदलू असा सज्जड दम देखील अजित पवारांनी या बैठकीत दिला आ

अजित पवार यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक विभागाचे पदाधिकारी गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार आहे. वक्फ सुधारणा विधेयकातील काही मुद्यांबाबत ही भेट असल्याची सूत्रांची माहिती आहे. या भेटीत शिष्टमंडळ अमित शाह यांनी सभागृहात जे आश्वासन दिलं ते कागदावर असाव अशी मागणी करणार असल्याचं सांगण्यात येत आहे. वक्फ बोर्डावर गैर मुस्लिम सदस्य नको, अनेक वर्षापासून वक्फ बोर्डकडे जी जमीन आहे, त्याचे मूळ मालक कोण याचा शोध घेण्याबाबत जो मुद्दा मांडला आहे. त्याचा विचार करावा अशी मागणी करण्यात येणार आहे. विधेयकामध्ये ४० पैकी १४ विषय बाजूला करण्यात आले आहेत, अशी सभागृहात माहिती देण्यात आली.

## अजित पवारांनी माणिकराव कोकाटेंना झापलं

**अजित पवार यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना बेशिस्त वागणुकीवरुन झापल्याची माहिती देखील समोर आली आहे. सातत्याने माध्यमांमध्ये पक्षाला अडचणीची ठरणारी वक्तव्य करणे, जनता दरबारला पक्ष कार्यालयात हजर न राहणे यावरून अजित पवारांनी झापल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. माणिकराव कोकाटे आज बैठकीसाठी देखील अर्धा तास उशिरा आल्यामुळे अजित पवारांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. राष्ट्रवादी कॉंग्रे स पक्षाची आज नियमित मंगळवारची बैठक देवगिरी निवासस्थानी पार पडली.**

# राज्याचे नवीन वाळू धोरण जाहीर

## घरकुल धारकांना ५ ब्रास मोफत वाळू मिळणार, मंत्रिमंडळात काल झाला निर्णय

मु ंबई, : विविध योजनांमधील घरकूल लाभार्थ्यांसाठी पाच ब्रासपर्यंत मोफत वाळू तसेच वाळूची साठवणूक, रेतीचे उत्खनन आणि तिची ऑनलाइन विक्री करण्याऐवजी वाळूला लिलाव पद्धतीद्वारे परवानगी देणाऱ्या राज्याच्या नव्या वाळू धोरणाला मंगळवारी मंत्रिमंडळाने मान्यता दिली. नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुटवडा विचारात घेता नव्या धोरणात कृत्रिम वाळूस प्रोत्साहन देण्यात आले आहे. यासाठी सुरवातीला विविध शासकीय, निमशासकीय बांधकामामध्ये २० टक्के कृत्रिम वाळू वापरणे बंधनकारक करण्यात येईल. त्यानंतर पुढील तीन वर्षांत कृत्रिम वाळू बंधनकारक केली जाणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्याचे नवे वाळू धोरण आणण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार मंगळवारच्या मंत्रिमंडळ बैठकीत नव्या वाळूधोरणाला मंजुरी देण्यात आली. दोन वर्षांपूर्वी तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बेकायदा वाळू उपसा रोखण्यासाठी लिलाव पद्धत बंद करून ऑनलाइन विक्रीचे धोरण आणले होते. मात्र, बावनकुळे यांनी नव्या धोरणात वाळूचे ऑनलाइन विक्रीचे धोरण गु ंडाळून ठेवले आहे. नव्या धोरणानुसार, आता पर्यावरण विभागाच्या परवानगीनंतर नदीपात्रातील वाळू गटांसाठी जिल्ह्यातील प्रत्येक उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वाळू गटांचा एकत्रित एकच ई-लिलाव प्रसिद्ध करण्यात येईल. या लिलावाचा कालावधी दोन वर्षांचा राहणार, तसेच खाडीपात्रातील वाळू गटांसाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने निश्चित केलेल्या प्रत्येक वाळू गटासाठी ई-लिलाव पद्धतीने कार्यवाही करण्यात येईल. या लिलावाचा कालावधी तीन वर्ष राहील. लिलावाद्वारे उत्खनन करण्यात येणाऱ्या प्रत्येक वाळू गटामधील १० टक्के वाळू विविध घरकूल लाभार्थ्यांसाठी पाच ब्रासपर्यंत मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या २८ मार्च २०२०च्या अधिसूचनेत परिशिष्ट ९मध्ये अनुक्रमांक ४ नुसार निश्चित केले गेलेले वाळूगट तसेच, ज्या वाळू गटांना पर्यावरण विभागाची परवानगी मिळालेली नाही. तसेच जे वाळू गट लिलावामध्ये गेलेले नाहीत



अशा नदी, नाले, ओढे आदी गटांमधील वाळू सरकारच्या गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थ्यांना, गावकऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक आणि सामूहिक कामासाठी तसेच शेतकऱ्यांना स्वतःच्या विहिरीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# कोकणातील हापूस ओळखणे झाले सोपे

रत्नागिरी कोकणातील आंबा बागायतदारांच्या हापूसला आता जीआयचे संरक्षण मिळाल्याने आता बनावट हापूस आंबा ओळखणे सहज शक्य होणार आहे. एकप्रकारे कोकणातील आंबा व्यावसायिकांना हा मोठा दिलासा मिळाला आहे. आतापर्यंत कोकणातील हापूस आंब्याच्या बागायतदारांनी १ हजार ८४५ जीआय टॅग मिळवले असून या जीआय प्रणालीमुळे बाजारपेठेत हापूसची गुणवत्ता आणि दर्जा कायम ठिकून राहण्यास मदत मिळणार आहे. कोकणातील हापुसला जीआयचे संरक्षण मिळाल्यामुळे बनावट आंबे सहज ओळखता येणार आहेत. याबाबत हापूस आंबा उत्पादक विक्रेता सहकारी संघाचे सचिव मुकु ंद जोशी सांगितले की, देशातील वैयक्तिक उत्पादनांसाठी जारी केलेल्या जीआय टॅगची ही सर्वाधिक संख्या असणार आहे. हापूस आंब्याचा जीआय ट ॅग कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर आणि ठाणे या पाच जिल्ह्यांमध्ये उत्पादित होणाऱ्या फळांसाठी राखीव असणार आहे.रसाळ चव आणि रंगांसाठी ओळखल्या जाणाऱ्या आंब्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही आंब्यांना हापूस टॅग वापरण्याची परवानगी नाकारण्यात आली आहे. तसेच फळ उत्पादक आणि विक्रे त्यांची सहकारी संस्था असलेल्या संघाने कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या इतर प्रदेशांमध्ये देखील उत्पादन होणा-या आंब्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या हापूस या संज्ञेच्या उल्लंघनाविरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली आह

# फिट व तरुण दिसण्यासाठी या बड्या सेलिब्रेटींनी भात व चपातीला केलं बाय

मुंबई : बॉलीवुडमध्ये असे अनेक सेलिब्रिटी आहेत, ज्यांनी आपल्या फिटनेसने चाहत्यांना नेहमीच प्रभावित केले आहे. विशेषतः, वयाची पन्नाशी पार केल्यावरही त्यांच्या बॉडीमध्ये कोणतीही कमतरता जाणवत नाही. यामागील एक मोठे कारण म्हणजे त्यांचा योग्य आहार आणि शिस्तबद्ध जीवनशैली. आज आपण अशाच काही लोकप्रिय सेलिब्रिटींच्या डाएटबद्दल जाणून घेणार आहोत, जे चपाती आणि भातापासून दूर राहून आपली तंदुरुस्ती कायम ठ वतात. अनेक सामान्य लोकांचे सेलिब्र ेटींसारखे सुंदर नाही किमान फिट दिसण्याचे व वेटलॉस करण्याचे स्वप्न असते पण ते कसे करावे हे समजत नाही. सेलिब्रेटी सुद्धा कोणताही महागडा उपाय करत नाहीत त्यामुळे तुम्हीही त्यांच्या या टिप्स व डाएट नक्की ट्राय करू शकता. शाहरुख खान - वन मील ए डे डाएटचे पालन : बॉलीवुडचा बादशाह शाहरुख खान आपल्या फिटनेसबाबत खूपच काटेकोर आहे. तो मवन मील ए डेफ (दिवसातून फक्त एक वेळ जेवण) डायेट फॉलो करतो. त्याच्या आहारात चपाती आणि भाताचा समावेश फारसा नसतो. त्याऐवजी, तो प्रोटीनयुक्त आहारावर भर देतो. मांसाहार, अंडी, सुकामेवा आणि भरपूर पोषणमूल्ये असलेले पदार्थ यांचा त्याच्या आहारात समावेश असतो.

# राजेभाऊ फड यांनी घेतली खा.बजरंग सोनवणे व मस्के यांची भेट

## राष्ट्रवादी कॉंग्रे स शरदचंद्र पवार पक्षाला परळीत मिळणार नवी कार्यकारिणी!

परळी वैजनाथ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी विधानसभा मतदार संघातील कार्यकारिणीला नवे शिलेदार मिळण्याचे संकेत आहेत. नवी कार्यकारिणी स्थापन करण्याच्या अनुषंगाने पक्षाच्या वरीष्ठ नेत्यांची सोमवारी चर्चा झाली. पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांची भेट घेऊन पक्षाच्या संघटन बांधणीबद्दल सखोल चर्चा केली. त्यामुळे आता पक्षाच्या रिक्त असलेल्या पदांवर नव्या नियुक्त्या केल्या जाणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. आगामी काळात रचनात्मक बांधणी आणि धोरणात्मक काम करण्यासंदर्भात यावेळी या भेटीत चर्चा झाली. याप्रसंगी पक्षाचे नेते अंकुशराव ढोबळे, बाबासाहेब शिंदे, अक्षय मु ंडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रे स शरदचंद्र पवार पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी पक्षाचे नेते राजेभाऊ फड सक्रिय झाले आहेत. सोमवार, दिनांक ०७ एप्रिल रोजी त्यांनी खा.बजरंग बप्पा सोनवणे व पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांची भेट घेऊन सखोल चर्चा केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा, देशाचे नेते शरदचंद्र पवार यांचा प्रेरक विचार घेऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फौज मतदारसंघात उभी करणार



असून, पक्षाला बळकटी येईल अशा स्वरूपाचे काम करणाऱ्या आणि पक्षाशी निष्ठेने राहणाऱ्या कार्यकर्त्यांना पदाच्या माध्यमातून काम करण्याची संधी मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले आहे. सत्तेच्या विरोधात असलो तरी पक्षाला मानणारा मोठा वर्ग या मतदारसंघात पक्षाच्या पाठीशी आहे. त्यामुळे शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी युवक- युवती यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आगामी काळात धोरणात्मक काम करण्यात येणार आहे. तसेच भविष्यकाळात येणाऱ्या सर्व निवडणुकांना सामोरे जाण्यासाठी रचनात्मक बांधणी आणि धोरणात्मक काम करण्याची तयारी आम्ही ठेवली असल्याचे राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. या भेटीप्रसंगी पक्षाचे नेते अंकुश ढोबळे, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, अक्षय मु ंडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# आता बापाचंही नाव बदला,जलील यांच्या टीकेवर चंद्रकांत खैरे संतापले, खुलताबादचे नाव रत्नपूर झाले पाहिजे.

गेल्या काही दिवसांपासून छत्रपती संभाजीनगरातील खुलताबादचे (Khultabad) नाव रत्नपूर करा अशी मागणी केली जात आहे. याच खुलताबादमध्ये बादशाहा औरंगजेबाची कबर आहे. भाजपा तसेच शिवसेनेच्या शिंदे गटाने ही मागणी केली आहे. असे असतानाच आता या नाव बदलण्याच्या मागणीवर शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. खुलताबादचे रत्नपूर हे नाव झालेच पाहिजे. आम्ही ही मागणी खूप दिवसांपूर्वी केलेली आहे, असं खैरे यांनी म्हटलंय. खुलताबाद हे नाव कशाला पाहिजे? शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी 8 मे 1988 रोजी मराठवाडा सांस्कृतिक मंडळात या शहराचे नाव संभाजीनगर ठेवले होते. त्यावेळी आम्ही रत्नपूरची आठवण करून दिली होती. तेव्हा बाळासाहेब ठाकरे हे खुलताबादचं रत्नपूर करायचं असं म्हणाले होते. खुलताबाद हे नाव कशाला पाहिजे. खुलताबादचे नाव रत्नपूर झाले पाहिजे. म्हणूनच आम्ही खुलताबादला रत्नपूर असे म्हणतो, असे चंद्रकांत खैरे म्हणाले. रामराज्य असताना खुलताबादचे नाव भद्रावती नगर होते. महाभारतावेळी या शहराचे




नाव रत्नपूर ठेवण्यात आले. मात्र औरंगजेबाच्या कटकारस्थानामुळे खुलताबाद हे नाव ठेवण्यात आलं. रत्नपूर हे नाव पौराणिक आहे. हेच नाव झालं पाहिजे, अशी मागणीही खैरे यांनी केली आहे. इम्तियाज जलील यांच्यावर सडकून टीका भाजपाने आता रस्त्यांची, शहरांची, रुग्णालयांची नावे बदलली आहेत. सर्व नावे बदलून झाली असून आता त्यांना त्यांच्या बापाचे नाव बदलण्याची वेळ आली आहे, असं एमआयएमचे नेते इम्तियाज जलील म्हणाले होते. यावर बोलताना, माझ्या बापाचं नाव भाऊसाहेब खैरे आहे, ते आहेच. हे नाव आम्ही कधीही बदलत नाही. इम्तियाज जलील काहीही म्हणतात. त्यांच्या म्हणण्याला आम्ही महत्त्व देत नाही, असा पलटवार खैरे यांनी केला. भाजपाची सत्ता, त्यांनी निर्णय घ्यावा- खैरे भाजपानेही रत्नपूर नावाची मागणी केली आहे. या मागणीला आमचे समर्थन आहे. मात्र खुलताबादचे नाव रत्नपूर करण्याची मागणी आमची आहे. त्यांचे सरकार आहे. त्यांनी हे नाव बदलण्याचा निर्णय मंत्रिमंडळात घ्यायला हवा. नाव बदलण्याचा मुद्दा मंत्रिमंडळ बैठकीत आल्यानंतर नाव बदलतं, असंही खैरे म्हणाले

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com